**प्रकरण तिसरे**

# पशुचे महत्त्व, वाढ आणि प्राण्यांच्या बाजारकेंद्राचे वितरण

## विभाग अ

3.1 प्रस्तावना

3.2 साहित्य पुनरावलोकन

3.3 पशुधनाचा अर्थ, व्याख्या

3.4 पशुसंवर्धन व्याख्या

3.5 पशुपालनाचा इतिहास

3.6 लातूर जिल्हयातील पशुधनाचे वर्गीकरण

3.7 पाळीव प्राण्यांचे स्वरुप

3.8 पाळीव प्राण्यांचे महत्त्व

## विभाग ब

3.9 प्रादेशिक वितरण

3.10 प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील लोकसंख्या वाढ

3.11 प्राण्यांची वाढ

3.12 बाजारकेंद्राची अभिक्षेत्रीय प्रणाली

3.13 प्राण्यांच्या बाजारकेंद्राचे वितरण

3.14 जिल्हा मुख्यालयापासून अंतर

3.15 जवळच्या शहरापासून अंतर

3.16 दिवसनिहाय बाजारकेंद्राचे वितरण

3.17 बाजारकेंद्राचे कालबद्ध वितरण

3.18 पशुंचे जत्राकेंद्र (वार्षिक बाजार)

3.19 विशिष्ट प्रदेशानुसार जनावरांच्या बाजारकेंद्राचे वितरण

3.20 रस्ते जोडणीवर आधारीत बाजारकेंद्राचे वितरण

3.21 प्राण्यांच्या वाढीवर (संख्या) आधारीत वितरण

3.22 व्यवसायिकांच्या उपस्थितीवर बाजारकेंद्राचे वितरण

3.23 प्राण्यांची आवक व विक्रीनुसार बाजारकेंद्राचे वितरण

**प्रकरण तिसरे**

# पशुचे महत्त्व, वाढ आणि प्राण्यांच्या बाजारकेंद्राचे वितरण

## 3.1 प्रस्तावना :

मागील प्रकरणामध्ये अभ्यासकेंद्रातील सामाजिक, आर्थिक आणि प्राकृतिक वैशिष्टयांचा सखोल आढावा घेतलेला आहे. वरील सर्व वैशिष्टयांचा प्राण्यांच्या बाजारकेंद्रावर पडणारा प्रभाव अभ्यासला आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण विभाग 1 मध्ये पशुचे महत्त्व अभ्यासले आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती व पशुपालन होय. पशुधन राष्ट्राची अनमोल संपदा आहे. शेतीशी निगडीत असलेला एक जोडधंदा म्हणजे पशुसंवर्धन होय. पुरातन काळापासून शेतीला पशुसंवर्धनाची जोड आहे. आजच्या यांत्रिक शेतीमध्ये सुद्धा त्याची गरज आहे. त्यामुळे प्रस्तुत विभाग 1 मध्ये पशुपालनाचा अर्थ, पशुपालनाचा इतिहास, लातूर जिल्हयातील 2011 पशुधन, लातूर जिल्हयातील पाळीव प्राण्यांचे वर्गीकरण आणि पशुचे महत्त्व अभ्यासले आहे. विभाग 2 मध्ये अभिक्षेत्रीय प्रादेशिक घटकांचा बाजारकेंद्राचा वाढ, विकास आणि बाजारकेंद्राच्या वितरणावर होणा-या परिणामाचा अभ्यास केला 'वाढ' या घटकामुळे भूतकाळातील बाजारकेंद्राची कल्पना येते व भविष्यकाळात त्यात सुधारणा करता येतात. वितरण या घटकाच्या अभ्यासामुळे अभ्यासक्षेत्रातील प्राण्यांचे बाजारकेंद्राचा विकास लक्षात येतो. त्यामुळे बाजारकेंद्रातील वाढ आणि वितरण पुढील घटकांच्या आधारे अभ्यासले आहे. लातूर जिल्हयातील 1990-2011 कालावधीत बाजारकेंद्रातील लोकसंख्या वाढीचा दर, प्राण्यांच्या वाढीचा दर, बाजारकेंद्राचे वितरण, जिल्हा मुख्यालयापासून अंतर, निकटवर्ती शहर, दिवसनिहाय वितरण, कालावधीनुसार वितरण, दळणवळण, सुविधेनुसार वितरण, बाजारकेंद्रात उपस्थित लोकसंख्या, व्यवसायिकांच्या उपस्थिती, प्राण्यांची आवक आणि विक्रीनुसार वितरण इ.चा अभ्यास केलेला आहे.

**3.2 साहित्य पुनरावलोकन :**

अनेक विचारवंतांनी बाजारपेठ भूगोलाचा अभ्यास केलेला आहे. ब्रुम्ले (1971) यांनी बाजारकेंद्राचे वितरण आणि वर्गीकरण संदर्भात विशेष अभ्यास केला आहे. हॉडर (1965) युरोपीय देशातील (भूमीतील) बाजारकेंद्राचे वितरण अभ्यासले. श्रीवास्तव यांनी बाजारकेंद्राचे वितरण प्रकार आणि वर्गीकरण अभ्यास केला आहे. वनमाली (1981) आठवडी बाजारकेंद्र आणि भारतातील शहरी भागाचा विकास या बद्दल लेखन केले. जगदाते (1990) पुणे जिल्हयातील सद्यस्थितीतल बाजारकेंद्राचा आर्थिक दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. खान (2006) यांनी आपल्या डॉक्टरेट संशोधन अहवाल अमरावती जिल्हयातील प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील व्यापार अभ्यासला. विधाते (2006) आठवडी प्राण्यांच्या बाजारकेंद्राचे संघटन आणि व्यवस्थापन अभ्यासले. उबाले आणि लोखंडे (2011) प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील व्यापार वितरण आणि वर्गीकरण यांचा अभ्यास केला. लोखंडे आणि पवार (1999) यांनी कोल्हापूर जिल्हयातील आठवडी प्राण्यांच्या बाजारकेंद्रे आणि वितरण प्रकारानुसार अभ्यासले.

**3.3 पशुधन अर्थ :**

पशुधन हा शब्द पशु + धन असा विभागला जातो. संयुक्तपणे पशु हा शब्द पुल्लिंगी असून त्याचा अर्थ जनावर निर्बुद्ध किंवा द्रव असा होतो. थोडक्यात पशुधन हा नैसर्गिक साधनसंपत्ती असून तिचा मानवाला विविध माध्यमातून उपयोग होतो. पशुगणना ही मोजणी दर पाच वर्षाला केली जाते.

**3.4 पशुसंवर्धन व्याख्या :**

पाळीव जनावरे (उदा. गाय, म्हैस, शेळी, मेंढी, उंट, घोडा इ.) जोपासना करुन त्यांच्यापासून दूध व इतर उत्पादने मिळवणे म्हणजे पशुसंवर्धन होय.

थोडक्यात उपयुक्त अशा पशुंची जोपासना करणे म्हणजे पशुसंवर्धन होय.

**लातूर जिल्ह्यातील पशुपालन पशुधन :-**

ज्या प्राण्यांपासून मानवाला इजा होत नाही व मानवाला त्यांचा उपयोग होतो त्यास पाळीव प्राणी म्हणतात.

त्या त्या प्रदेशातील भौगोलिक परिस्थितीला अनुसरुन मानव त्या प्रदेशात पशुपान केले जाते. लातूर जिल्हा हा पठारी प्रदेशात येत असल्यामुळे लातूर जिल्हयात प्रामुख्याने गाय, बैल, शेळी, मेंढी, घोडा, गाढव, उंट, इतर पशुंचे उपयोगानुसार संवर्धन केले जाते.

(पशुसंवर्धन) त्यासाठी अनुकूल व पोषक असे हवामान लातूर जिल्हयास लाभले आहे. त्यामुळे हा व्यवसाय येथे मोठया प्रमाणात चालतो व पोषक हवामानामुळे उत्तम दर्जाचे पशुधन आपल्याला जिल्हयात पहावयास मिळते.

शेतीला जोडधंदा म्हणून प्राचीन काळापासून हा व्यवसाय जिल्हयात चालत आहे. पूर्वी जोडधंदा म्हणून केला जाणारा हा व्यवसाय आज मात्र व्यापारी तत्त्वावर केला जात आहे. त्यामुळे पाळीव प्राण्यांचे महत्त्व व त्यांच्या बाजारकेंद्राचे महत्त्व वाढले आहे. पूर्वीपेक्षा अधिक विकास झाल्याने त्याचे उत्पादन वाढले आहे. त्यात बदल होत असलेला दिसून येतो.

इ.स. 2011 च्या पशुगणनेप्रमाणे लातूर जिल्ह्यातील खालील पशुधन आहे.

**तक्ता क्र. 3.1**

**जिल्ह्यातील पशुधन इ.स. 2011**

| पशु | पशुसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| गाय व बैल | 365568 | 47.83 |
| म्हैस | 234578 | 30.69 |
| मेंढ्या | 46575 | 6.09 |
| शेळया | 117584 | 15.38 |
| एकूण | 764305 | 100 |

स्त्रोत : 2011 पशुगणना अहवाल.

वरील तक्त्यावरुन आपणास लातूर जिल्ह्यातील एकूण पशुधन दिसून येते. एकूण पशुधनात सर्वाधिक पशुधन गाय व बैल हे आहे. जे एकूण पशुधनापैकी 47.83टक्के आहे. दुस-या क्रमांकावर म्हैस 30.69 टक्के पशुधन आहे. शेळया 15.38टक्के, मेंढया 6.09टक्के आहेत. सर्वात कमी मेंढया आहेत.

**आलेख क्र. 3.1**

**जिल्ह्यातील पशुधन इ.स. 2011**




## 3.5 पशुपालनाचा इतिहास :

संस्कृतीचा उगम कोठे आणि कसा झाला? याबाबतची निश्चित माहिती उपलब्ध नाही. परंतु, संस्कृती ही प्राण्यांच्या माणसाळविण्याशी संबंधित आहे. रानटी अवस्थेतील प्राण्यांना माणसाळविण्याचा पहिला प्रयत्न मध्याश्म युगामध्ये झाला असला तरी बरेचसे प्राणी नवपाषाण युगामध्ये इ.स.पूर्व (1000 ते 12000) माणसाळविण्यात आले आणि याबाबत कुत्रा सर्वात अग्रेसर आहे. त्यानंतर मेंढया, शेळया, गाय व बैलाचा क्रम लागतो. ही जनावरे मानवास जवळपास 10000 वर्षे पूर्वीपासूनच उपयोगी पडत आहेत.

प्रारंभी मनुष्य टोळयाटोळयांनी राहत असे तेव्हा त्याचे जीवन भटके होते. पुढे तो शेती करु लागल्यानंतर त्याच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. घोडा, बैल, म्हैस हे प्राणी प्रथमतः ओझे वाहणारे प्राणी म्हणून तो पाळू लागला. पुढे शेतीच्या अवजाराचा शोध लागल्यानंतर त्यांना शेतीच्या कामासाठी उपयोगता आणले जाऊ लागले. मुख्य व्यवसाय शेतीचा व त्याला पोषक म्हणून गुरे पाळणे ही अवस्था कित्येक शतके चालू होती. मात्र मांसाहार सर्रास चालू असल्यामुळे मेंढया व इतर प्राण्यांचे पालन करण्याकडे लोकांचा कल वाढला. मेंढया, शेळयासारखे प्राणी टोळयाटोळयांनी राहत असल्यामुळे या पाळीव प्राण्यामध्ये अतःप्रजनन होऊन त्यांच्या जाती निर्माण होऊ लागल्या. माणसातील टोळयाटोळयातील संघर्षामुळे युद्धाच्या कामी उपयोगी पडतील अशा स्वारीच्या घोडयांची पैदास सुरु झाली.

वेदकालीन भारतामध्ये पशुपालनाचा स्वतंत्रपणे व्यवसाय करणारे लोक होते. उल्लेख ऋग्वेदात आहे. महाभारत काळामध्ये गाई-गुरांचे कळप पाळण्यात येत असत. इतकेच नव्हे तर भरपूर दूध देणा-या गाई अस्तित्वात असल्याची माहिती मिळते. सर्वप्रथम गाई-गुरे कुठल्या भागात माणसाळविण्यात आले याबाबत सर्वमान्य प्रस्थापित माहिती उपलब्ध नसली तरी सर्व उपलब्ध पुराव्यांचा कल हा बहुतेक भारत, मध्य आशिया तसेच युरोप व उत्तर आफ्रिकेकडे जातो.

आद्यपुराणश्म युगात रानबैलाचे जीवाश्म आढळले तर मध्ययुगाश्म युगात हत्यारात प्रगती झाली होती. या काळात गेंडा, हत्ती, रानबैल इ. प्राण्यांचा सर्वत्र वापर होता. मांजरा नदीच्या खो-यात या प्राण्यांचे जीवाश्म आढळून आले आहेत. ताम्रपाषाण युग हे महाराष्ट्रातील प्रगत युग समजले जाते. या काळात प्राथमिक स्वरुपाची शेती सुरु झाली. विविध हत्यारे वापरण्यात येऊ लागले. हे लोक खरीप व रब्बी पिके घेत आणि शेळया, मेंढया, गाई, बैल, म्हशी इ. प्राणी पाळीव लोक थोडयाफार प्रमाणात शिकार व मांसाहार करीत.

लोहयुगाच्या सुरुवातीला इ.स. 700 ते 900 ब्रिटन व उत्तर युरोपातील हवामानात बराचरा बदल घडून आला व कडक थंडीपासून गुरांचे संरक्षण करण्याची गरज भासू लागली. तेव्हा भटकेपणा बराच कमी होऊन उन्हाळयात डोंगर पठारावर हिवाळयात सपाटीवर असे स्थलांतर करुन हे लोक राहू लागले. पुढे इ.स. 1750 च्या सुमारास बरीच चरावू राने कुंपनानी बंदिस्त करण्यात येऊ लागली व गुरांना निवा-यांसाठी गोठे या बंदिस्त रानामध्ये बांधून हिवाळयात जागेवरच चारापाणी करण्यात येऊ लागले. ख-या अर्थाने ही आजच्या पशुपालनाची ही सुरुवात होती. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. फक्त गुरे पाळण्याचा धंदा करणा-यामध्ये युरोपातील ब्रिटन हा पहिला पशुपालक होय. मात्र शास्त्रीय दृष्टिकोनातून पशुपालनाचा धंदा करणारा पहिला पशुपालक म्हणून रॉबर्ट बेकवेल याचा उल्लेख करावा लागेल. बेकवेल व कोलिंग बंधू यांनी अठराव्या शतकात निवड पद्धतीचा शास्त्रीय दृष्टीकोनाचा अवलंब करुन दूध व मांस यांच्या उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टिने गुरांचे प्रजनन सुरु करुन या क्षेत्रात एक बोलबाला होऊन ही पद्धत ब-याच देशात अवलंबली गेली. याच पद्धतीचा डुकरे व

मेंढयासाठी उपयोग करण्यात आला व जलद गतीने वजन वाढणा-या व अधिक लोकर देणा-या मेंढयाच्या जातीची निर्मिती झाली.

त्या त्या देशातील हवामान, खाद्यपदार्थ, पशुंची अनुवंशीय घडण व त्यांच्या पोषण पद्धतीमुळे पशुसंवर्धनाच्या चालीरीतीतही फरक आढळून येतो. इजिप्त, भारत, पाकिस्तान, मलेशिया, ब्रम्हदेश, आग्नेय आशियातील इतर देशामध्ये दुधोत्पादनासाठी म्हशी अधिक पाळण्याचा कल आहे. काही प्रमाणात संकरीत गायी पाळण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच शेतीच्या कामासाठी आणि ओढकामासाठी रेडे व बैल वापरण्यात येतात. अमेरिका, युरोप व बहुसंख्या पाश्चात्य जगात गायीच्या दुधाचा वापर मोठया प्रामणात होतो. मध्य पूर्वेकडील देशात शेळी, उंटीण यांच्या दुधाचा वापर अधिक आहे. भारतात गाय, म्हैस, शेळी यांच्या दुधाचा सर्वात जास्त उपयोग होतो तर बैल व रेडा यांचा शेती कामात व वाहतुकीसाठी उपयोग होतो.

### 3.6 लातूर जिल्हयातील पाळीव प्राण्यांचे वर्गीकरण :

**भारतातील गोधन :**

भारतात गोवंशाच्या 27 जाती आहेत. त्यापैकी 5 महाराष्ट्रात आहेत. भारतीय गुरांच्या देशी जातीपैकी काही शेती व मालवाहतुकीसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. लातूर जिल्हयात पशुधनाचे उपयोगावरुन व स्थानावरुन दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

**1) उपयोगावरुन वर्गीकरण :**

**अ) दुधाच्या जाती :**

या जातीच्या गायी जास्त दुध देतात. मात्र बैल शेतीच्या कामासाठी फारसे चांगले समजले जात नाहीत. कारण बैलाची चाल अतिशय धिमी/हळू असते. उदा. साहिवाल, लालसिंधी, गीर धारपास्कर, राठी इ.

**ब) ओढकामाच्या जाती :**

या जातीच्या गायी कमी दुध देतात परंतु बैल धष्टपुष्ट, डौलदार आणि ओढकामास अत्यंत नावाजलेले असतात.

उदा. अमृमहाल, खिलारी, माकवी, डांगी, कंगायम इ.

**क) दुहेरी उद्देशिय जाती :**

या जातीतील गायी साधारणपणे ब-यापैकी दूध देतात आणि बैलही शेतीच्या कामासाठी चांगले असतात.

उदा. हरियाणा, देवणी, कृष्णाकाठी कॉंक्रेज इत्यादी.

**2) मुळस्थानावरून वर्गीकरण :**

जनावरांच्या मुळस्थानावरुन देशी गायी व विदेशी गायी असे दोन प्रकार पडतात

**अ) देशी जाती :**

या जनावरांमध्ये मुळस्थान भारतातील ज्या राज्यात आहे त्यावर आधारीत खालीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) पंजाब व हरियाणा | : | साहिवाल, हरियाणा व हिस्तारजाबी |
| 2) राजस्थान | : | राष्ठी, नागौर, मेहवती |
| 3) उत्तरप्रदेश | : | पोवार, केनवारी, खेरीगढ |
| 4) गुजरात | : | गीर, कॉंक्रेज, धारपारकर |
| 5) मध्य प्रदेश | : | नाळवी, निमाडी |
| 6) महाराष्ट्र | : | खिल्लारी, देवणी, गौळाऊ, कांगी, कृष्णकाठी |
| 7) कर्नाटक | : | अमृतमहल, कंगायम, हळकीकर |
| 8) आंध्रप्रदेश | : | देवणी, नेल्लोर |
| 9) तामिळनाडू | : | ओंगाल, बारगुर, कंगायम |
| 10) आसाम | : | सिरी |
| 11) बिहार | : | बचौर |

**ब) विदेशी जाती :**

विदेशातून वळू किंवा वळूचे वीर्य अथवा गायी आणून संकरित गायीची पैदास केलेली आहे. विदेशातील ज्या ठिकाणाहून ते आणले त्या मुळस्थानावरुन त्यांचे वर्गीकरण केले आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) होलिरिल | : | फिजीयन हॉलंड |
| 2) जर्सी | : | इंग्लंड आणि फ्रान्समधील जर्सीबेट |
| 3) ब्राऊनस्वीस | : | स्वित्झरलॅंड |

4) रेड डॅलिश आणि रेड ड्रेन : डेन्मार्क

5) आयरशायर : स्कॉटलँड

6) गर्नसी : इंग्लिश खाडीतील गर्नसी बेट

**लातूर जिल्हयातील गोधन :**

भारतात गोवंशाच्या एकूण 27 जाती आहेत. देशातील वेगवेगळया राज्यात त्याचे मूळ स्थान आहे. अभ्यासक्षेत्रासाठी आपण लातूर जिल्हयाची निवड केली आहे. त्यामुळे लातूर जिल्हयात पुढील गोधन जातीचा समावेश होतो. 1) खिलारी, 2) देवणी, 3) लालकंधारी, 4) डांगी , 5) हालस्टिन, 6) जर्सी इ. लातूर जिल्हयातील महत्त्वाच्या जाती पुढीलप्रमाणे :

**1) खिलारी :**

**मुळस्थान :** महाराष्ट्रातील सांगली, सोलापूर, सातारा, कोल्हापूर व लातूर जिल्हयात प्रामुख्याने आढळतात. म्हसवड खिलार, तापी खिलार, जातीमध्ये आटपाडी खिलार (द.महाराष्ट्र) व नकली खिलार या पोटजाती आढळतात.

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) अत्यंत चपळ व शक्तीमान.
2) शेताच्या कामासाठी बैल अत्यंत उपयुक्त
3) शर्यतीसाठी बैल प्रसिद्ध.
4) रंग शुभ्र पांढरा किंवा राखाडी, डोळे बारीक व रागीट, कपाळ फुगीर चेहरा लांबट व अरुंद.
5) शिंगे टोकदार व सरळ उभी असतात.
6) मान आखूड व शिंड मोठी असते. कान लहान व टोकदार जमिनीस समांतर असतात.

**भौगोलिक परिस्थिती :**

खिलार ही जनावरांची जात ज्या भागात आढळते तो भाग अर्धशुष्क आहे. या भागात 40 ते 70 सेमी पाऊस पडतो. येथील उन्हाळे उष्ण असतात. येथील जमिन हलकी आणि साधारण काळसर आहे. लातूर जिल्हयात मांजरा नदीच्या खो-यात काळी

गाळाची जमिन आढळते. येथे ज्वारी, कापूस पिके घेतात, येथील जनावरे गवत व कडब्यावर जगतात.

**उपयोग बैल :**

शेतीच्या कामासाठी बैल नावाजनेले असतात. तसेच शर्यतीसाठी अत्यंत वेगाने धावण्यासाठी प्रसिद्ध आहेत. खिलार ही महाराष्ट्रातील गुरांची जात असल्यामुळे ती महाराष्ट्रात वातावरणात निकोप वाढते व खिलार वळूला बाजारात भरपूर किंमत मिळते.

**गायीचे जनन व दुध क्षमता :**

खिलार जातीच्या कालवडी 3 वर्षानंतर वयात येतात. त्यांचे प्रथम विण्याचे सरासरी वय 4 वर्ष आहे. या जातीच्या गाईचे दूध वासरांनाच पुरते. या रोज 1 ते 1.5 लिटर दूध देतात. या गाई साधारणतः 8 महिने दूध देतात.

**2) देवणी :** लातूर व उस्मानाबाद जिल्हयात ही जात आढळते. अहमदपूर , निलंगा , उदगीर , उस्मानाबाद , उमरगा इत्यादी.

**मुळस्थान :** मराठवाडा व कर्नाटक सीमा, आंध्रप्रदेश.

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) रंग पांढरट व वानराच्या रंगासारखा म्हणून वानरी म्हणतात.
2) शरीर ऐटदार, सवाई चाल, कान लांब व खाली मागे वळलेली शिंगे आखूड बाजूस मागे वळलेले असतात.
3) पाय जाड, बेंबी मोठी, शेपटी लांबा चाबकासारखी असते तिचा गोंडा काळसर.
4) या जातीच्या गाईचे वजन 300 व बैलाचे 500 कि.ग्रॅ. असते.

**भौगोलिक परिस्थिती :**

देवणी जनावरे जेथे आढळतात तो भाग जरा डोंगराळ आहे. या भागात पावसाचे प्रमाण 80 ते 100 सेमी आहे. उन्हाळे जास्त उष्ण असतात. या भागात कापूस, ज्वारी, बाजरी, भूईमुग ही पिके घेतात. तसेच थोडया प्रमाणात गवत वाढते. तेथील जनावरे कडबा व गवतावर जगतात.

**उपयोग बैल :**

देवणी जात ही अतिशय चपळ व मजबूत असल्याने ओढकामासाठी, शेती व वाहतुकीसाठी उपयुक्त असतात.

**गायीचे जनन व दूध क्षमता :**

देवणी जातीच्या कालवडी साधारणपणे 3.5 ते 4 वर्षाच्या झाल्यावर प्रथम वितात. या गाई एका वेतात 900 कि.ग्रॅ. दूध देतात.

**3) लालकंधारी :**

**मुळस्थान :** मराठवाडा, कर्नाटक सीमा, लातूर, नांदेड जिल्हयातील कंधार, देगलूर, बिलोली व मुखेड तालुके लातूर जिल्हयामध्ये लातूर, अहमदपूर , उदगीर इत्यादी.

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) कंधारी जातीच्या जनावरांचा रंग फिका व ते गडद लाल असतो. म्हणून या जनावरांना लालकंधारी म्हणतात.
2) ही जनावरे मध्यम आकाराची असून यांचे कपाळ रूंद व फुगीर असते. त्यांची शिंगे प्रथम बाहेर आणि नंतर आत वळलेली आणि मध्यम आकाराची असतात.
3) कान लांब दोन्ही बाजूस झुकलेले असतात. त्यांचे शरीर व शेपूट लांब असते. खुरे कठीण असतात.
4) या जातीच्या गाईचे वजन 300 व बैलाचे 500 कि.ग्रॅ. असते.

**भौगोलिक परिस्थिती :**

ही जात जेथे आढळते तेथे पावसाचे प्रमाण कमी व तापमान जास्त असते. येथे उन्हाळे 40 ते $50^0$ असते. एकूण तेथील हवामान अर्धशुष्क आहे. या भागात साधारण व भारी दोन्ही प्रकारच्या मृदा आढळतात. येथील जनावरे कडबा व गवतावर वाढतात.

**उपयोग बैल :**

या जातीचे बैल काटक, मजबूत व चपळ असतात. या बैलांचा शेती व वाहतुकीसाठी उपयोग होतो.

**गायीचे जनन व दूध क्षमता :**

देवणी जातीच्या कालवडचे प्रथम पिण्याचे वय 3.5 ते 4.5 वर्ष असते. या जातीच्या गायी दूधास कमी असतात.

**4) डांगी :**

**मुळस्थान :** गुजरातमधील डांग जिल्हा हे या जातीचे मुळस्थान आहे.

**प्रदेश :** महाराष्ट्रात डांग जातीची जनावरे नाशिक जिल्हा इगतपुरी व घोटी, अहमदनगर जिल्हा, अकोला तालुका, रायगड, कर्जत, ठाणे, शहापूर, जव्हार माखाडे, डहाणू, लातूर, नांदेड, उस्मानाबाद या भागात आढळतात.

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) डांगी जनावरांचा रंग काळा असतो. त्यांच्या शरीरावर पांढरे डाग असतात. यांच्या शरीराची कातडी तेलकट व मऊ असते.
2) डोळे लहान व कपाळ रुंद असतात. या जातीच्या बैलाचा खांदा रुंद असतो.
3) या जातीचे जनावरे काटक व पावसाळा सहन करणारी असून शक्तीशाली असतात.
4) या जातीच्या गाईचे वजन 300 व बैलाचे 450 कि.ग्रॅम. असते.

**भौगोलिक परिस्थिती :**

हे पशु जेथे आढळतात, त्या प्रदेशाची उंची 500 ते 600 मी. असते. येथील जमीन काळी आणि उतारावर लालसर आहे. या भागात 150 ते 225 सेमी पाऊस पडतो. येथे भात, नाचणी, ज्वारी ही पिके येतात. या जनावराबरोबरच व मारवेल व गवत प्रमुख खाद्य असते.

**उपयोग बैल :**

या जातीचे वळू 3 ते 3.5 वर्षानंतर पैदाशीसाठी वापरतात. बैल शेती वाहतुकीसाठी उपयोगी पडतात. मात्र त्यांची गती  कमी असते.

**गायीचे जनन व दूध क्षमता :**

डांगी गाईच्या कालवडी 4 ते 4.5 वर्षाच्या वयात प्रथम वितात. या जातीच्या गाई एका वेतात 550 ते 680 कि.ग्रॅ. दूध देतात.

**ब) विदेशी गाईच्या जाती :**

महाराष्ट्रातील होलस्टिन फिजियन व जर्सी या गाई मोठया प्रमाणात आढळतात. आयरशायर व ब्रानस्विस या जाती आपल्याकडील हवामानात तग धरू शकत नाहीत.

**1) होलस्टिन / फिजियन :**

**मुळस्थान :** हॉलंड या देशात गाईचे मुळस्थान आहे.

**प्रदेश :** महाराष्ट्रात सर्वत्र या जाती आढळतात. लातूर, उस्मानाबाद, नांदेड, मराठवाडा व इतर

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) रंग काळा व पांढरा काळया व पांढ-यांच रंगाचे प्रमाण काळया ठिपक्यापासून ते जवळ जवळ संपूर्ण काळया रंगापर्यंत असू शकते.

2) शरीर भारी व वजन भक्कम सरासरी मादीचे वजन 600 किग्रॅ तर नराचे वजन 900 किग्रॅ. पर्यंत असते.

3) शिंगे अत्यंत लहान, पाठ सरळ व खांदा नसलेली, कास मोठी व स्तन समान अंतरावर असतात.

4) जनावरांची आहार क्षमता जास्त असून दुधात मलईचे प्रमाण 3.5टक्के पर्यंत असते.

**उपयोग :**

दूध उत्पादनासाठी ही जात सर्वश्रेष्ठ आहे. एका वेतात साधारण 6150लि. पर्यंत दूध देते. संकरीत जाती पैदाशीसाठी या जाती मोठया प्रमाणात वापरल्या जातात.

**2) जर्सी :**

**मुळस्थान :** इंग्लंड व फ्रान्समध्ये असलेले जर्सी नावाचे बेट तसेच आयर्लंड/युनायटेड किंगडम या भागात या गाई आढळतात.

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) रंग हरणासारखा व काही पांढरे ठिपके असलेले तर काही तांबडया रंगाचे असतात.

2) शिंगे आखूड, पाठीचा कणा सरळ व शिंड नसते.

3) कपाळ खोलगट, आचळ मोठे व भरदार असते.

4) गाईचे वजन 400 ते 600 कि.ग्रॅम. बैलाचे वजन 600 ते 800 कि.ग्रॅम.

5) दुधाळ जनावरांची सर्व तळगे जर्सी गाईत असतात.

6) ही जात उष्ण तापमानात टिकून राहते व तिची रोगप्रतिकारक शक्ती ही जास्त असते.

**उपयोग :**

या जातीच्या दुधात मलईचे प्रमाण अधिक असते. (5 ते 5.8 टक्के) त्यामुळे भाव चांगला मिळतो. एका वेतात 4000 लि. पर्यंत दूध मिळते. गाईचे वजन कमी असल्याने आहार कमी मात्र दूध अधिक देतात. त्यामुळे त्य लोकप्रिय होतात.

**म्हशीच्या जाती व प्रकार :**

लातूर जिल्हयामध्ये गोसंवर्धनाबरोबर म्हैस संवंर्धनाचाही व्यवसाय केला जातो. सन 2007 मध्ये लातूर जिल्हयात 8.90 लक्ष पशुधन होते. त्यापैकी म्हैसवर्ग 2.29 लक्ष होता. त्यामुळे म्हैस संवर्धन लातूर जिल्हयात मोठया प्रमाणात केले जाते. गाईच्या तुलनेत म्हशी अधिक दूध देतात. त्यामुहे हा व्यवसाय महत्त्वाचा समजला जातो.

**म्हैस संवर्धनासाठी पुढील जातीची जोपासना केली जाते.**

1) मुर्रा
2) जाफराबादी
3) पंढरपुरी / नागपुरी
4) सुरती
5) गावरान
6) निळी रावी

**1) मुर्रा :**

**मुळस्थान :** मुख्यतः पंजाब व दिल्लीच्या आसपास आढळतात. यांनाच दिल्ली म्हैस असेही म्हणतात.

**प्रदेश :** महाराष्ट्रात मराठवाडा, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, औरंगाबाद, महाराष्ट्राच्या इतर भागातही आढळतात.

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) रंग काळा, शिंगे लहान व गोलाकार डोक्यावर आतल्या बाजूस गुंडाळलेली.
2) पाय लहान व मजबूत.
3) शरीर भारी व वजनदार
4) भरदार कास व स्तन मोठे.

**उपयोग :**

उत्तम दूध उत्पादनासाठी प्रसिद्ध एका वेतात 3000 ते 4500 लिटर दूध देतात. दूधात फॅटचे प्रमाण 7 ते 8 टक्के पर्यंत असते. रेडयाचा उपयोग शेती उपयोगासाठी होतो.

**2) जाफराबादी :**

**मुळस्थान :** गुजरातमधील काठेवाड भागात जाफराबाद गाव, कच्छ व सौराष्ट्रात आढळते.

**प्रदेश :** महाराष्ट्रात बहुतांशी जिल्हयात लातूर, उस्मानाबाद

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) रंग काळा
2) भरदार हाडे व शरीर मोठे
3) सरळ व रुंद पाय
4) शिंगे खूप लांब टोकदार व मागे वळलेली
5) कास मध्यम, स्तन मध्यम वजन भारी असते. या म्हशींना चारा जास्त लागतो.

**उपयोग :**

म्हशी सरासरी 2200 लि. दूध देतात.

**3) पंढरपुरी / नागपुरी :**

**मुळस्थान :** पंढरपुरी ही जात महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हयात आढळते तर नागपुरी ही नागपूर व वर्धा परीसरात आढळते.

**प्रदेश :** महाराष्ट्रातील ब-याच जिल्हयात लातूर येथे.

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) या जातीचा रंग करडा असून तोंडावर व शेपटीवर पांढरे रंग असतात.
2) शरीर आकाराने लहान व सडपातळ असून शिंगे लांब व तलवारीसारख्या आकाराची असतात.

**उपयोग** **:**

या म्हशी दूध कमी देत असल्या तरी पाखडणा-या आहेत. कारण निकृष्ट प्रकारचा चारा त्यांना चालतो. तसेच कोठेही चरुन पोट भरण्याची त्यांची क्षमता आहे.

**उपयोग :**

दूध उत्पादन प्रति वेत 1000 ते 2500 लिटर इतके असून दुधात मलईचे प्रमाण 6 ते 8.5 टक्के असते. या म्हशी दुष्काळात सहज तग धरु शकतात.

**4) सुरती :**

**मुळस्थान :** गुजरातमधील सुरतच्या आसपास.

**प्रदेश :** महाराष्ट्रातील ब-याच जिल्हयात लातूर येथे.

**शारीरिक वैशिष्ट्ये :**

1) या मध्यम आकाराच्य व कमी उंचीच्या असून रंग भुरकट असतो. गळा, कपाळ व शेपटीचा गोंडा यावर पांढरे ठिपके असतात.
2) शिंग कोयत्याच्या आकाराची असतात.
3) डोके लांब व रुंद डोळे मोठे.
4) वजन 400 कि.ग्रॅ. , रेडा 600 ते 650 कि.ग्रॅ.
5) उत्तम प्रजनन क्षमता.

**उपयोग :**

या म्हशी सरासरी 1800 लि. दूध देतात. घृतांशाचे प्रमाण 7 ते 9 टक्के असते.

**मराठवाडी म्हैस :**

**मुळस्थान :** मराठवाडा औरंगाबाद, उस्मानाबाद, नांदेड, लातूरसह महाराष्ट्रातील इतर जिल्हयात आढळते.

**निळी रावी :**

या म्हशीचा रंग काळा व भुरा असतो. या म्हशीचे वजन 450 ते 650 कि.ग्रॅम आणि रेडयाचे वजन 600 ते 700 कि.ग्रॅम असते. या जातीच्य म्हशी रोज 8 ते 9 लिटर दूध देतात.

## 3.7 पाळीव प्राण्यांचे स्वरुप :

उपयुक्त अशा पशुंची जोपासना करणे म्हणजे पशुपालन होय.

उदा. गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी, घोडा, गाढव, कोंबडया इ.

थोडक्यात मानव आपल्या उपयोगासाठी ज्या प्राण्यांचे पालन करतो त्यास पाळीव प्राणी म्हणतात.

**स्वरुप :**

पूर्वीच्या काळी ही पाळीव प्राण्यांचा अभ्यास वर्णनात्मक स्वरुपात केला जात असे. परंतु काळाच्या ओघात त्याचे स्वरुप बदलले व पाळीव प्राण्यांच्या स्वरुपात परिवर्तन झाले.

1) प्राचीन काळी प्राण्यांच्या वर्णनात्मक अभ्यास केला जात असे परंतु मानवी दृष्टिकोन आणि प्राण्यांचा केला जाणारा अभ्यास यात झपाटयाने परिवर्तन होत गेले. त्यातून पाळीव प्राण्यांच्या अभ्यासाचे स्वरुप गतिमान होत गेले.

2) **व्यापक स्वरुप :**
मानवाची ज्ञानकक्षा ही दिवसेंदिवस व्यापक होत आहे. त्यामुळे पाळीव प्राण व पाळीव प्राण्यासंबंधीचे पूर्ण ज्ञान मानवाला मिळवता येऊ लागले आहे. या नवनवीन अभ्यासातून पाळीव प्राण्यांचे स्वरुप व्यापक बनले आहे.

**3) अंतरविद्याशाखीय स्वरुप :**

पाळीव प्राण्यांचा उगम, वितरण, प्रसरण त्यांचा विकास इ. घटकांची उकल करत असताना इतर अनेक शास्त्राचा आधार घ्यावा लागत आहे.

उदा. प्राण्यांचा उगम विकास, जीवशास्त्र अनुकुल घटक- पर्यावरणशास्त्र अधिवास व अन्न - वनस्पती भूगोल. त्यामुळे पाळीव प्राण्यांचे स्वरुप अंतरविद्याशाखीय ठरले आहे.

**4) सर्वस्पर्शी स्वरुप :**

पाळीव प्राण्यांचा अभ्यास करतांना पाळीव प्राण्यांच्या संपूर्ण अंगाचा अभ्यास केला जातो. त्यामुळे पाळीव प्राण्यांचे स्वरुप सर्वस्पर्शी बनले आहे.

**5) अनेक पदरी स्वरुप :**

पाळीव प्राण्यांचा अभ्यास हा अनेक पदरी असल्याचे दिसून येते. पाळीव प्राण्यांचा अभ्यास करताना अनेक ज्ञानशाखेचा आधार घ्यावा लागत आहे. तसेच पाळीव प्राण्यांचा प्रसार, उगम, उत्क्रांती, इतिहास, स्थलांतर, वितरण, अनुकूलन, प्राण्यांचे वर्गीकरण, पाळीव प्राण्यांचा पर्यावरणावर व पर्यावरणाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध तसेच प्राणी जीवनावर मानवी कार्याचा परिणाम इ. घटकांचा अभ्यास पाळीव प्राण्यांचा अभ्यास करताना अभ्यासावे लागते. त्यामुळे पाळीव प्राण्यांचे स्वरूप अनेक पदरी बनले आहे.

**3.8 पाळीव प्राण्यांचे महत्त्व :**

मानवाच्या जीवनात पशुंना खूप महत्त्व आहे. शेतीबरोबरच शेतीपुरक उद्योगामध्येही जनावरांना असलेले महत्त्व त्याबरोबरच जनावरांच्या बाबतीत मानवाची असलेली धार्मिक भावना यामुळेही जनावरे जोपासली जातात. गेल्या काही दशकापासून पशुंना खूप महत्त्व प्राप्त झाले आहे ते पुढीलप्रमाणे.

1) गाई व म्हशीपासून दूध हे उत्तम प्रतीचे प्राणीजन्य भरपूर प्रथिने असलेले नैसर्गिक खाद्य मनुष्यास मिळते. महाराष्ट्रातील 90 लाख गायी आणि 55 लाख म्हशीपासून दूध उत्पादन मिळते. यापैकी 35 लाख लिटर दूध शासकीय व सहकारी संस्थामार्फत जमा केले जाते. राहिलेले 20 लाख लिटर दूध हे खाजगी व्यवसायातील उद्योगामार्फत जमा केले जाते.

2) बकरी, मेंढी, डुक्कर यांचे पासून उत्तम प्रतीचे मांस मिळते. शेळयामेंढया पासून लोकर मिळते. तिचा वापर उबदार कपडे तयार करण्यासाठी केला जातो.

3) गायी व म्हशीपासून शेतीकामासाठी व वाहतुकीसाठी उत्तम बैल व रेडे मिळतात. शेतीची मशागत, कोळपणी तयारीसाठी पशुधनाची गरज असते.

4) जनावरांपासून उत्तम प्रतीचे शेणखत, लेंडीखत/सेंद्रिय खत शेतीसाठी मिळते. गोमुत्र हे उत्तम कीडनाशक मिळते. गोबर गॅस संयंत्र शेतावर चालतात. जळण्यासाठी शेणापासून गोव-या तयार करतात.

5) जनावरांच्या हाडांपासून फॉस्फरस व कॅल्शिअमयुक्त जनावर खाद्य व बोनमील खत मिळते.

6) जनावरांपासून कातडी मोठया प्रमाणात मिळते. ती चामडी उद्योगात उपयोगी पडते. पशुधनाच्या चामडयापासून बॅग्ज, पर्स, चप्पल , बुट, बेल्ट इ.वस्तू बनविल्या जातात.

7) पशुसंवर्धन शेतीस पुरक धंदा म्हणून शेतकरी कुटुंबाच्या उत्पादनात भर पडते व त्याची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

8) भारतात सुमारे 30 टक्के भूमीहीन कुटुंबे आहेत. त्यांना व्यवसाय व काम मिळू शकते. उदरनिर्वाहाचे एक खात्रीचे साधन म्हणून ते हा व्यवसाय करु शकतात.

9) देशातील 70 टक्के शेतकरी या व्यवसायात गुंतले आहेत.

10) रोजगार उपलब्धता ही मोठी समस्या दुग्ध व्यवसायाने कमी होत चालली आहे.

11) पशुधनापासून कातडी वस्तू, दुध पावडर यांना विदेशात मोठया प्रमाणात मागणी असल्याने आपली निर्यात वाढून परकीय चलन मिळते.

12) भारतात 3500 पशु कत्तलखाने आहेत. ज्यामध्ये जाणा-या मांस मिळवण्यासाठी पशु कापले जातो. या कापल्या जाणा-या पशुत 8टक्के गाय व बैल 15टक्के, म्हशी 30टक्के, मेंढया , बक-या 50टक्के, डुकरे 29टक्के व इतर पशु 6.4टक्के असे प्रमाण आहे. इ.स. 2007 मध्ये 1718कोटी रुपयोच मांस व मांसापासून निर्मित पदार्थ निर्यात झाले.

अर्थव्यवस्थेतील उत्पादन स्त्रोतांचा विचार केल्यास एकंदर मांस उत्पादनातील जवळ जवळ 50टक्के दुग्धउत्पादनातील 90टक्के आणि चर्मोद्योगातील 5टक्के उत्पादन गोवंशापासून मिळते. शेती उद्योगाच्या उत्पादनातील पशुधनाचा वाटा 26टक्के पर्यंत वाढला आहे.

जगातील एकूण पशुसंख्येपैकी सर्वाधिक म्हणजे 15टक्के पशुधन भारतात आहे. इ.स. 2005 च्या पशुगणतीनुसार 57टक्के म्हशी, 17टक्के गायी भरतात आहेत. दुभत्या जनावरांच्या बाबतीत हे प्रमाण 16टक्के आहे. मेंढया बाबतीत आपण 3 क्रमांक तर शेळयांच्या बाबतीत 2 क्रमांकावर आहोत.

इ.स. 2002-2003 साली भारताने दुग्धोत्पादनात 845 लक्ष मेट्रीक टन दुध उत्पादन करुन जगात प्रथम क्रमांक सातत्याने 1999 पासून आहे.

## विभाग ब

### 3.9 प्रादेशिक वितरण :

बाजारकेंद्रावर परिणाम करणा-या घटकांमध्ये अनेक भूगोलतज्ञ प्रोदशिक घटक महत्त्वाचा मानतात. प्राण्यांच्या वाढीच्या दरावरुन आपल्याला मागील बाजार केंद्राची स्थिती बद्दल अंदाज बांधता येतो. तसेच यामुळे ग्राहक व व्यवसायिक यांना वरील फायदा मिळतो पर्यायाने तेथील भौगोलिक प्रदेशाचा विकास साधला जातो. (प्रा.पवार आणि प्रा.लोखंडे 2000) यांनी प्रत्येक भौगोलिक घटकांचा बाजार केंद्राच्या वाढ, विकास व वितरणावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आणि स्वतंत्र परिणाम होतो. डॉ. खान यांनी 1971 साली बाजरकेंद्राचे वितरण व वर्गीकरण अभ्यासले आहे. त्यानुसार सामाजिक, आर्थिक पैलुशी संबंध साधता येतो. घारपुरे व पवार केवळ सांख्यिकीय वितरण पुरेसे नाही तर अशा घटकांचा लोकसंख्या, शहरे, गावे, क्षेत्र कसा आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे.

### 3.10 प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील लोकसंख्या वाढ :

**तक्ता क्र. 3.2**

प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील लोकसंख्या वाढ 1991-2011

| अ.क्र. | प्राण्यांचे बाजारकेंद्र | 1991-2001 | 2001-2011 |
|---|---|---|---|
| 1 | अहमदपूर | 17.55 | 10.90 |
| 2 | औसा | 19.50 | 24.54 |
| 3 | उदगीर | 9.33 | 27.10 |
| 4 | औराद शहाजानी | 15.55 | 13.80 |
| 5 | कासारशिर्सी | 12.86 | 10.12 |
| 6 | किनगाव | 19.80 | 37.13 |
| 7 | मुरुड | 15.43 | 7.48 |
| 8 | लातूर | 28.90 | 24.65 |
| 9 | निलंगा | 28.54 | 21.30 |
| 10 | नळेगाव | 15.89 | 24.72 |
| 11 | हंडरगुळी | 30.57 | 33.22 |
| 12 | रेणापूर | 12.61 | 30.85 |
| 13 | देवणी | 31.57 | 22.39 |

स्त्रोत : लातूर जिल्हा जनगणना अहवाल 1991, 2001, 2011.

**आलेख क्र. 3.2**

प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील लोकसंख्या वाढ 1991-2011




**3.10 प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील लोकसंख्या वाढ :**

प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील उपस्थित लोकसंख्या वाढीचा वेग अभ्यासणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे अभ्यास क्षेत्राची वाढ आणि विकास समजून येते. त्यासाठी बाजारकेंद्राचा शेवटच्या दोन दशकातील लोकसंख्या वाढीचा वेग अभ्यासणे आवश्यक आहे.

**1991-2001 (दशक):**

तक्ता क्र. 3.2 व आलेख 3.2 नुसार अभ्यासक्षेत्रातील 13 प्राण्यांची बाजारकेंद्रे आपण संशोधनासाठी निवडलेली आहेत. 1991-2001 या दशकात जिल्हयात 10 तालुक्याचा समावेश होता. 1992 मध्ये चाकूर, रेणापूर तर 1999-2001 मध्ये शिरुर अनंतपाळ, जळकोट, देवणी या नवीन तालुक्याची निर्मिती झाली. तक्ता क्र. 3.2 व आलेख 3.2 नुसार 1990 ते 2001 या दशकात प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील लोकसंख्या वाढीचा वेग हा अधिक दिसून येतो. हंडरगुळी व देवणी या बाजारकेंद्राचा लोकसंख्या

वाढीचा दर 30टक्के च्या वर आहे. सुरुवातीपासूनच या प्रसिद्ध बाजारकेंद्राकडे लोकांचा ओढा अधिक दिसून येतो. त्यानंतर लातूर, निलंगा, औसा या बाजारकेंद्राचा वाढीचा दर हा 25टक्के च्या वर दिसून येतो व किनगाव, रेणापूर, नळेगाव, मुरुड या बाजारकेंद्राची दर 20टक्के च्या खाली आहे. उदगीर या एकमेव बाजारकेंद्राचा दर 10टक्के च्या खाली दिसून येतो. कारण हंडरगुळी व देवणी हे बाजारकेंद्र प्रसिद्ध असल्यामुळे ग्राहकांचा कल या बाजारकेंद्राकडे आकर्षित आहे.

**2001-2011 (दशक) :**

तक्ता क्र. 3.2 व आलेख 3.2 नुसार 2001-2011 या दशकातील बाजारकेंद्रातील लोकसंख्या वाढीचा दर अधिक आहे. हंडरगुळी या बाजारकेंद्राचा वाढीचा दर 1991-2001 या दशकाच्या तुलनेत 3टक्के ने वाढलेला आहे म्हणजे हा वाढीचा दर 33.22टक्के एवढा आहे. तर देवणी य बाजार केंद्राचा लोकसंख्या वाढीचा दर 22.39 आहे. 1991-2001 या दशकापेक्षा तो 10टक्के ने कमी दिसून येतो. किनगाव, नळेगाव, रेणापूर मध्ये हा लोकसंख्या वाढीचा दर वाढलेला दिसून येतो. तो अनुक्रमे 37.13%, 24.72%, 30.85%, 1990-2001 दशकाच्या तुलनेत दुप्पटीने वाढलेला दिसून येतो. औसा उदगीर 24.54%, 27.10%, या बाजारकेंद्रातही लोकसंख्या वाढीचा दर अधिक दिसून येतो. लातूर, निलंगा, मुरुड बाजारकेंद्रात फारशी लोकसंख्या वाढ झालेली दिसत नाही. औराद शहाजानी, कासारशिर्सी, अहमदपूर या बाजारकेंद्रात लोकसंख्या वाढीचा दर हा घटलेला दिसून येतो. हा दर 13.80%, 10.12%, 10.90%, 1991-2001 या दशकाच्या तुलनेत अल्प प्रमाणात लोकसंख्येत घट झालेली दिसून येते.

### 3.11 प्राणी बाजारकेंद्रात प्राण्यांच्या वाढीचा वेग :

तक्ता क्र. 3.3 मध्ये दिलेल्या माहितीनुसार अभ्यासक्षेत्रातील प्राण्यांच्या वाढीचा दर 1991-2001 लातूर 40.68%, अहमदपूर 77.00% , उदगीर 41.33%, औसा -6.75% , निलंगा 25.41% दिसून येतो. जिल्हा निर्मिती नंतर या 5 तालुक्याचाच जिल्हयात समावेश होता. त्यामुळे नंतर ज्या नवीन पाच तालुक्यांची निर्मिती झाली. त्या

तालुक्यातील प्राण्यांच्या वाढीचा दर येथे दिला नाही. 2001-2011 या दशकात पूर्ण 10 तालुक्यांचा समावेश लातूर जिल्हयात होता. सहजाजिक वरील तालुके विभागून नवीन तालुक्याची निर्मिती झाली त्यामुळे त्या त्या तहसील नुसार प्राण्यांच्या वाढीचा दर ही विभागला गेला व या दशकात प्राण्यांच्या वाढीचा दर हा 1991-2001 या दशकाच्या तुलनेत अगदी अल्प आहे. सर्वात अधिक प्राणी वाढीचा दर उदगीर 37.73, त्यानंतर देवणी 17.15%, अहमदपूर 12.78%, चाकूर 14.91%, लातूर 6.34% , औसा 5.59% तर निलंगा, शिरुर अनंतपाळ, जळकोट, रेणापूर या तालुक्याचा प्राणी वाढ झालेली नाही. 1991-2001 च्या तुलनेत हा दर अनुक्रमे निलंगा 4.66%, रेणापूर -23.50%, जळकोट -16.65% तर शिरुर अनंतपाळ -5.70% प्राण्यांची वाढ या तहसीलमध्ये 2001-2011 या दशकात घटलेली दिसून येते.

**तक्ता क्र. 3.3**

**प्राण्यांच्या बाजारकेंद्रात प्राण्यांच्या वाढीचा वेग**

| बाजारकेंद्राचे नाव | 1990-2001 | 2001-2011 |
|---|---|---|
| लातूर | 40.68 | 6.34 |
| अहमदपूर | 77.00 | 12.78 |
| उदगीर | 41.33 | 37.73 |
| औसा | -6.75 | 5.59 |
| निलंगा | 25.41 | -4.66 |
| चाकूर | | 14.91 |
| रेणापूर | | -23.50 |
| जळकोट | | -16.65 |
| शिरुर अनंतपाळ | | -5.70 |
| देवणी | | 17.15 |
| | 177.67 | 27.34 |

Source : Department of Animal Husbandry, Government of Maharashtra 1991-2011.

आलेख क्र. 3.3

प्राण्यांच्या बाजारकेंद्रात प्राण्यांच्या वाढीचा वेग




नकाशा क्र. 3.1

लातूर जिल्हयातील बाजारकेंद्राचे तालुकानिहाय वितरण




जळकोट व शिरुर अनंतपाळ ही पाळीव प्राण्यांचे बाजारकेंद्र नाहीत.

## 3.12 बाजारकेंद्राची अभिक्षेत्रीय प्रणाली :

अभ्यासक्षेत्रातील बाजार केंद्राचे वर्गीकरण करण्यासाठी अतिनिकटवर्ती पद्धतीनुसार (Nearest-Neighbour Analysis) या पद्धतीचा अवलंब केलेला आहे. यामध्ये जवळील, शेजारी प्रदेशापासून एखाद्या प्रदेशाचे सरासरी अंतर व यादृच्छिक वर्गीकरणाचे अपेक्षित सरासरी अंतर यांच्यामधील तुलनात्मक अभ्यास महत्त्वाचा ठरतो. क्लार्क आणि इव्हान्स (1954) यांनी सुरुवातीस या तंत्राचा विकास केला आणि त्याचा वापर वेगवेगळया जातीच्या वनस्पतीच्या प्रणाली मोजण्यासाठी केलेला आहे. पण सद्या अनेक भूगोल तज्ञांनी वनस्पतीच्या प्रादेशिक प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी या तंत्राचा वापर केलेला दिसून येतो. प्रस्तुत संशोधनासाठी डिके यांनी विकसीत केलेले खालील सुत्र वापरले आहे.

$$Rn = \frac{VA}{YE}$$

खुलासा :

Rn = जवळील शेजारी प्रदेश मापन

$$VA = \frac{\text{ग्रामीण वसाहतीमधील एकूण अंतर}}{\text{एकूण ग्रामीण संख्या}}$$

$$YE = \frac{1}{2\sqrt{d}}$$

खुलासा ,

$$D = \frac{\text{प्राण्यांचे बाजारकेंद्र}}{\text{निवडलेल्या प्रदेशाचे क्षेत्र}}$$

## 3.13 बाजारकेंद्राचे वितरण :

नकाशा क्र. 3.1 नुसार बाजारकेंद्राचे वितरण हे प्रामुख्याने प्रादेशिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक घटकांवर अवलंबून असते. लातूर अभ्यासकेंद्रात प्रामुख्याने 13 बाजार केंद्राचा समावेश आहे. त्याचे वितरण आपण वेगवेगळया आधारे पाहणार आहोत. बाजारकेंद्राच्या सांख्यिकीय वितरणामुळे बाजारकेंद्राची स्थिती व वाढ विकास समजण्यास मदत होते.

**प्राण्यांच्या बाजारकेंद्राचे वितरण :**

भौगोलिक वितरण, अतिनिकटवर्ती वितरण, जिल्हा मुख्यालयापासून अंतर, लगतचे शहर, दिवसानुसार, कालावधीनुसार, ग्रामीण व शहरी वितरण, दळणवळणानुसार वितरण, उपस्थित लोकसंख्या, उपस्थित व्यवसायिक, प्राण्यांची आवक विक्रीनुसार वितरण इ. घटकांच्या आधारे दाखवण्यात आले आहे.

## 3.14 जिल्हा मुख्यालयापासून अंतर :

प्राण्यांच्या बाजार केंद्र वितरणात प्रामुख्याने अभ्यासक्षेत्रातील अंतर हा घटक महत्त्वाचा आहे. जिल्हा मुख्यालयापासून बाजार केंद्राचे अंतर 0 ते 100 कि.मी. पनर्यंत व्यापलेले आहे. ते पुढील तक्त्यावरुन समजेल. जिल्हा मुख्यालयापासून 0 ते 20 कि.मी.मध्ये (2) बाजारकेंद्राचा समावेश आहे. त्यात लातूर व रेणापूर, 20 ते 40 कि.मी. मध्ये मुरुष, औसा व नळेगाव या (3) बाजार केंद्राचा समावेश होतो. 40 ते 60 कि.मी. मध्ये औराद शहाजनी, कासारशिर्सी, निलंगा, अहमदपूर या (4) बाजारकेंद्राचा समावेश होतो. 60 ते 80 कि.मी.मध्ये उदगीर व हाळी या (2) बाजारकेंद्राचा समावेश होतो. 80 ते 100 कि.मी. मध्ये फक्त (2) देवणी आणि किनगावं यांचा समावेश होतो. सर्वात जास्त बाजारकेंद्र प्रामुख्याने 40 ते 60 कि.मी. (4) येतात.

**तक्ता क्र. 3.4**

**लातूर जिल्हा : प्राण्यांचे बाजार केंद्र व जिल्हा मुख्यालयापासून अंतर कि.मी.मध्ये**

| अ.क्र. | जिल्हा मुख्यालयापासून अंतर | प्राण्यांचे बजार केंद्राचे नाव | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 0 - 20 | लातूर, रेणापूर | 2 |
| 2 | 20 - 40 | मुरुड, औसा, नळेगाव | 3 |
| 3 | 40 - 60 | निलंगा, औराद (शहाजनी), अहमदपूर, कासारशिर्सी | 4 |
| 4 | 60 - 80 | उदगीर, हाळी | 2 |
| 5 | 80 - 100 | देवणी, किनगाव | 2 |

स्त्रोत : जिल्हा सेन्सस हॅंडबुक लातूर जिल्हा 2011.

नकाशा क्र. 3.2




**तक्ता क्र. 3.5**

**प्राण्यांचे बाजार केंद्र व जवळील शहरापासून अंतर कि.मी. मध्ये**

| अ. क्र. | तालुके | शहरांची संख्या | प्राण्यांचे बा.के. लगतच्या शहरापासून अंतर | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 0-10 | 10-20 | 20-30 | 30-40 | |
| 1 | लातूर | 2 | 1 | | | 1 | 2 |
| 2 | औसा | 1 | 1 | | | | 1 |
| 3 | निलंगा | 1 | 1 | | 1 | 1 | 3 |
| 4 | देवणी | - | 1 | | | | 1 |
| 5 | उदगीर | 2 | 1 | | 1 | | 2 |
| 6 | चाकूर | - | - | | 1 | | 1 |
| 7 | शि.अनंतपाळ | - | - | | | | - |
| 8 | रेणापूर | - | - | 1 | | | 1 |
| 9 | जळकोट | - | - | | | | - |
| 10 | अहमदपूर | 1 | 1 | | 1 | | 2 |
| | **एकूण** | **7** | **6** | **1** | **4** | **2** | **13** |

स्त्रोत : जिल्हा सेन्सेस हॅन्डबुक, लातूर जिल्हा 2011.

नकाशा क्र. 3.3

बाजारकेंद्राचे जवळच्या शहरापासून अंतर




## 3.15 जवळच्या शहरापासून अंतर किमी :

तक्ता क्र. 3.5 व नकाशा क्र. 3.3 नुसार प्राण्यांचे बाजार केंद्र त्यापासून जवळ असलेल्या शहरातील अंतर यांचा अभ्यास हा महत्त्वपूर्ण ठरतो. कारण प्राण्यांच्या बाजारकेंद्रातील बहुतांशी व्यापारी, ग्राहक, मध्यस्थ तसेच इतर लोकांचे हितसंबंध हा घटक बाजारकेंद्राच्या वाढ व विकास यावर परिणाम करताना दिसून येतो. याबरोबर शेतकरी, व्यापारी अपल्याला लागणारा काही माल, वस्तू बैल बाजारातून परतत असताना घेतात विक्री करतात. लातूर अभ्यासक्षेत्रामध्ये 13 बाजारकेंद्र येतात.

प्राण्यांचे बाजारकेंद्र व शहरातील अंतर यानुसार 0-10 कि.मी. मध्ये 6 बाजारकेंद्र आहेत. ही लगत असलेल्या बा.कें.संख्या दर्शवितात. 10-20 कि.मी. मध्ये 1 (रेणापूर) बाजारकेंद्र आहे. 20-30 कि.मी. मध्ये 4 बाजारकेंद्र आहेत. कासारशिर्सी, हाळी, नळेगाव, किनगाव ही बा.के.आहेत. प्रामुख्याने औसा, उदगीर, चाकूर, अहमदपूर या 4 तालुक्यात येतात. 30-40 कि.मी. मध्ये 2 बाजारकेंद्र येतात. ती लातूर व निलंगा

तालुक्यात आहेत. मुरुड व औराद शहाजनी, लातूर, औसा, निलंगा, उदगीर, अहमदपूर तालुक्यात 2,2 बाजारकेंद्र येतात. देवणी, चाकूर, रेणाप्व्व्द्धद्धद्वद्म मध्ये 1,1 बाजारकंद्र येते तर शि.अनंतपाळ व जळकोट मध्ये एकही बाजारकेंद्र नाही.

### 3.16 दिवसनिहाय बाजारकेंद्राचे वितरण :

तक्ता क्र. 3.6 नुसार लातूर अभ्यासक्षेत्रात प्रत्येक आठवडयाला 13 जनावरांचे महत्त्वाचे बाजार भरतता. बाजारकेंद्राचे दिवसनिहाय वर्गीकरण पुढील तक्त्यावरुन दिसून येते की, निलंगा तालुक्यात सर्वाधिक बाजारकेंद्र आहेत. याचे कारण निलंगा हा कृषीदृष्टया अग्रेसर आहे. जनावरांसाठी हिरवा चारा बारमाही उपलब्ध होतो. त्यामुळे पशुपालन मोठया प्रमाणात होते. त्यामुळे या तालुकयात सर्वाधिक बाजारकेंद्रे आहेत. लातूर, उदगीर व अहमदपूर येथे प्रत्येकी 2 बाजारकेंद्रे आहेत. औसा, देवणी, चाकूर, रेणापूर तालुक्यात सर्वात कमी 1 बाजारकेंद्र आहे. याचे कारण देवणी व रेणापूर ही नवीन तालुके झाले आहेत. पर्यायाने येथील लोकसंख्या कमी आहे. कमी लोकसंख्येची गावे आहेत. परंतु देवणी हे ऐतिहासिकदृष्टया देवणी वळू साठी प्रसिद्ध आहे. तर रेणापूर हा कृषीदृष्टया अग्रेसर आहे. त्यामुळे ही प्राण्यांच्या बाजारकेंद्राची ठिकाणे आहेत. नळेगाव हे निजामकालीन बाजारकेंद्र आहे.

बाजारकेंद्रामध्ये ही असमानता दिसून येत असली तरी दिवसनिहाय वितरणात ही विविधता दिसून येते. लातूर अभ्यासक्षेत्रातील दिवसनिहाय बाजारांचा विचार केला असता असे दिसून येते की, हाळी-रविवार, देवणी,अहमदपूर - सोमवार, नळेगाव-मंगळवार, निलंगा-बुधवार, औसा,उदगीर-गुरुवार, रेणापूर,निलंगा-शुक्रवार, मुरुड, औराद शहाजनी-शनिवार रोजी भरतात. एकूण 13 बाजार भरत असलेले आढळतात.

**तक्ता क्र. 3.6**

**लातूर जिल्हा : दिवसनिहाय बाजारकेंद्राचे वितरण**

| अ.क्र. | तालुके | आठवडयाचे दिवस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
| 1 | लातूर | | | 1 | | | | 1 |
| 2 | औसा | | | | | 1 | | |
| 3 | निलंगा | | | | 1 | | 1 | 1 |
| 4 | देवणी | | | | 1 | | | |
| 5 | उदगीर | 1 | | | | 1 | | |
| 6 | चाकूर | | | 1 | | | | |
| 7 | शि.अनंतपाळ | | | | | | | |
| 8 | रेणापूर | | | | | | 1 | |
| 9 | जळकोट | | | | | | | |
| 10 | अहमदपूर | | 1 | | 1 | | | |

स्त्रोत : जिल्हा हँडबुक लातूर जिल्हा 2011 व संशोधकाच्या क्षेत्रकार्यानुसार.

### 3.17 बाजारकेंद्राचे कालावधीनुसार वितरण :

बाजारकेंद्राच्या कालबद्धतेचा विचार केला असता जेथे विक्री व नफा जास्त मिळतो अशा बाजारकेंद्राला अधिक व्यापारी जाताना दिसून येतात. तसेच प्राण्यांच्या बाजारपेठेतील व्यापारी ही प्रामुख्याने जवळील बाजारकेंद्रांना प्राधान्य देतात. तसेच जेथे अधि सुविधा आहेत त्या बाजारकेंद्राला जातात.

भारतामध्ये प्राण्यांचे बाजार हे आठवडयाला एकदाच भरत असलेले दिसून येतात. ब्राम्ले (1974) यांनी दैनिक, आठवडी बाजार व जत्रा यांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये कालबद्धत वितरणातील घटक हे अभिक्षेत्रिय संघटनांशी प्रत्यक्ष संबंधित आहे. भारतामध्ये कालबद्धतेचा प्राण्यांच्या बाजारकेंद्राशी काही संबंध दिसत नाही. चीनमध्ये दहा दिवसांचा बाजार आठवडा असतो. त्याठिकाणी व्यापारी आपली जनावरे

घेऊन एका बाजारकेंद्रातून दुस-या बाजारकेंद्राला भेटी देतात. अशा प्रकारे व्यापार करुन ते दहा दिवसानंतर आपल्या गावी पोहोचवतात.

तक्ता क्र. 3.7 नुसार लातूर अभ्यासक्षेत्रामध्ये दोन प्रकारचे बाजार भरताना दिसून येतात. लातूर अभ्यासक्षेत्रात 13 प्राण्यांचे बाजारकेंद्र येतात. त्यापैकी फक्त हाळी व देवणी ही दोन महत्त्वाची व प्रसिद्ध बाजारक्रमाने दोन दिवस भरतात. बाकीची सर्व बाजारकेंद्रे आठवडयातून एक दिवस भरतात. अभ्यासक्षेत्रात कोणतेही आठवडी बाजारकेंद्र नाही. उदगीर, देवणी, लातूर येथे वार्षिक बाजार (जत्रा) भरताना दिसून येतात. ती तालुक्याची ठिकाणे आहेत. लातूर अभ्यासक्षेत्रामध्ये आठवडयातील सातही दिवशी 13 बाजारकेंद्रे भरतात. एक बाजार चक्र पूर्ण होते. सर्वच दिवशी बाजार असल्यामुळे व्यापा-यांना विश्राम दिवस मिळत नाही. खालील तक्त्यामध्ये वितरण दाखवलेले आहे.

**तक्ता क्र. 3.7**
**कालावधीनुसार बाजारकेंद्राचे वितरण**

| अ. क्र. | तालुके | बाजारकेंद्राची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | आठवडी | वार्षिक | एकूण |
| 1 | लातूर | 2 | 1 | 3 |
| 2 | औसा | 1 | | 1 |
| 3 | निलंगा | 3 | | 3 |
| 4 | देवणी | 1 | 1 | 2 |
| 5 | उदगीर | 2 | 1 | 3 |
| 6 | चाकूर | 1 | | 1 |
| 7 | शि.अनंतपाळ | - | | - |
| 8 | रेणापूर | 1 | | 1 |
| 9 | जळकोट | - | | - |
| 10 | अहमदपूर | 2 | | 2 |
| | | **13** | **3** | **16** |

स्त्रोत : जिल्हा हँडबुक लातूर जिल्हा 2011 व संशोधकाच्या क्षेत्रकार्यानुसार.

### 3.18 पशुंचे जत्रा केंद्र (वार्षिक बाजार) :

लातूर अभ्यासक्षेत्रामध्ये बहुतांश यात्रा स्थानिक साधुसंतांच्या किंवा धार्मिक उत्सवानिमित्त भरतात. मोठया यात्रोत जनावरांची खरेदी विक्री मोठया प्रमाणात होते. यात्रेत लहान मोठे व्यापारी आपली दुकाने लावतात. अशा तात्पुरत्या दुकानामधून शेतीमालाची मोठया प्रमाणात उलाढाल होते. जिल्हयात मोठया व महत्त्वाच्या यात्रा भरतात त्यात -

1) लातूर येथील श्री सिद्धेश्वर जिल्हयाचे ग्रामदैवत.
2) देवणी तालुका हत्तीबेट येथे (आश्विन शुद्ध 10)
3) उदगीर तालुक्यात श्री हावगीस्वामी ची यात्रा पौष पौर्णिमेला भरते.

येथे हजारो भक्त गण येतात. येथे जिल्हयातील पशुप्रदर्शन होते. निवडक जिल्हयातील उत्तम पशुंचा क्रमांक काढून रोख रक्कम बक्षीस म्हणून दिली जाते. यातून जिल्हयातील जनावरांच्या संवर्धनास चालना मिळते व आपला ऐतिहासिक ठेवा असलेले देवणी, लालकंधारी वळू, खिल्लारी पैदासीस चालना मिळते. जिल्हयात भरणा-या यात्रांची तालुकानिहाय माहिती खालीलप्रमाणे :

लातूर तालुक्यात विविध 18 ठिकाणी यात्रा भरतात. औसा तालुक्यात 16 ठिकाणी यात्रा भरतात. अहमदपूर तालुक्यात 12 ठिकाणी यात्रा भरतात. उदगीर तालुक्यात 10 ठिकाणी यात्रा भरतात. निलंगा तालुक्यात 20 ठिकाणी यात्रा भरतात. चाकूर तालुक्यात 11 ठिकाणी यात्रा भरतात. शिरुर अनंतपाळ येथे म.गांधीची यात्रा भरते.

### 3.19 विशिष्ट प्रदेशानुसार जनावरांच्या बाजारकेंद्राचे वितरण :

**तक्ता क्र. 3.8**

| अ.क्र. | प्रदेश | जनावरांचे बाजार केंद्र | |
|---|---|---|---|
| | | नावे | संख्या |
| 1 | ग्रामीण | किनगाव, हाळी, कासारशिर्सी, नळेगाव, औराद शहाजनी | 5 |
| 2 | शहरी | लातूर, मुरुड, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, देवणी, रेणापूर | 8 |
| | | एकूण | 13 |

स्त्रोत : जिल्हा हॅंडबुक लातूर जिल्हा 2011.

बाजारकेंद्राचे वितरण दाखवताना प्रदेश हा घटक अतिशय महत्त्वपूर्ण आहे. प्रदेशापरत्वे वितरणामध्ये ग्रामीण व शहरी अशा प्रकारे वितरण असे सांगण्यात आले आहे. प्राण्यांच्या बाजारकेंद्रामध्ये ग्रामीण बाजारकेंद्रे ही मुख्यतः अतिशय जुनी निजामकालीन आहेत. यात 5 बाजारकेंद्राचा समावेश होतो. तर शहरी 8 बाजारकेंद्रे आहेत.

**3.20 रस्ते जोडणीवर आधारीत बाजारकेंद्राचे वितरण :**

रस्ते सुविधा उपलब्ध असणे किंवा बाजार हे मुख्य रस्त्यांनी सोयीस्कररीत्या जोडलेला असणे ही बाजारकेंद्राच्या विकास व वाढीवर परिणाम करणारी महत्त्वपूर्ण आहे. लातूर अभ्यासक्षेत्रामध्ये पक्या रस्त्यांनी व्यवस्थितरीत्या जोडलेले आहे. संपूर्ण अभ्यासक्षेत्रामध्ये पक्के रस्ते आहेत.

अभ्यासक्षेत्रातील 95 टक्के बाजारकेंद्रे ही रस्त्यांनी जोडलेले आहेत. येथे महामंडळाच्या सुविधाबरोबरच खाजगी सुविधाही उपलब्ध आहेत. लातूर जिल्हयातून एकही राष्ट्रीय महामार्ग गेलेला नाही. लातूर अभ्यासक्षेत्रात 18 राज्य महामार्ग आहेत. त्यातील अगदी मोजकेच बाजारकेंद्राशी जोडलेले आहेत.

**3.21 प्राण्यांच्या संख्येवर आधारीत वितरण :**

लातूर अभ्यासक्षेत्रातील तहसीलनुसार प्राण्यांच्या प्राणी वाढीचे वितरण दाखवण्यात आले आहे. प्राणी वाढीचे वितरण हा घटक बाजारकेंद्राचे अभ्यास करताना अतिशय महत्त्वपूर्ण आहे. प्राण्यांची प्राणी वाढ (संख्या) ही प्रामुख्याने खालील सारणीत दाखवलेली आहे.

ज्या ठिकाणी बाजारकेंद्रातील प्राण्यांची संख्या 0-50000 मध्ये अहमदपूर, औराद शहाजनी, कासारशिर्सी ही बाजाराकेंद्रे येतात. तर 50000-100000 च्या दरम्यान निलंगा, उदगीर, औसा, लातूर ही बाजारकेंद्रे येतात. 100000-150000 मध्ये नळेगाव, मुरुड, किनगाव, रेणापूर ही चार बाजारकेंद्रे येतात. येथे सर्वात जास्त बाजारकेंद्रे आहेत. 150000 पुढे हंडरगुळी व देवणी ही बाजारकेंद्रे येतात. येथे 2

बाजारकेंद्रे आहेत. अभ्यासक्षेत्रातील सर्वात मोठा तालुका तसेच प्राण्यांची संख्या (वाढ) ही येथेच सर्वात जास्त आहे. कारण येथील बाजारकेंद्रे निजामकालीन आहेत. तसेच संपन्न व समृद्ध तालुका आहे. देवणी लालकंधारी, डांगी या जनावरांसाठी पोषक वातावरण येथील जनावरे 51 वेळा राष्ट्रीय पुरस्काराने गौरवले आहेत. संपूर्ण भारतातील प्रसिद्ध अशी बाजारपेठ उदगीर तालुक्याला लाभली आहे. त्यामुळे येथे प्राणी वाढ इतिहास काळापासून आजतागायत अधिक आहे.

तक्ता क्र. 3.9

**लातूर जिल्हा : बाजारकेंद्रातील प्राण्यांच्या संख्येवर आधारीत वितरण**

| अ.क्र. | एकूण प्राणी | बाजारकेंद्राचे नाव | बाजारकेंद्र संख्या | शेकडा प्रमाण% |
|---|---|---|---|---|
| 1 | 0-50000 | अहमदपूर, कासारशिर्सी, औराद शहाजनी | 3 | 23.07 |
| 2 | 50000-100000 | उदगीर, लातूर , औसा, निलंगा | 4 | 30.76 |
| 3 | 100000-150000 | नळेगाव, रेणापूर, किनगाव, मुरुड | 4 | 30.76 |
| 4 | 150000-पुढे | हंडरगुळी व देवणी | 2 | 15.38 |
| | | **एकूण** | **13** | **100%** |

स्त्रोत : जिल्हा हँडबुक लातूर जिल्हा 2011 व संशोधकाच्या क्षेत्रीय अभ्यासानुसार.

### 3.22 व्यवसायिकांच्या उपस्थितीवर बाजारकेंद्राचे वितरण :

**तक्ता क्र. 3.10**

| अ.क्र. | व्यवसायिकाची उपस्थिती | बाजारकेंद्राची नावे | संख्या | शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| 1 शहरी | 0-150000 | उदगीर, औसा, अहमदपूर | 03 | 23.08 |
| | 150000-पुढे | निलंगा, रेणापूर, देवणी, लातूर | 04 | 30.80 |
| 2 ग्रामीण | 0-150000 | कासारशिर्सी, औराद (शहा.), किनगाव | 3 | 30.80 |
| | 150000-पुढे | मुरुड, हंडरगुळी, नळेगाव | 3 | 15.90 |
| | | एकूण | 13 | 100% |

स्त्रोत : जिल्हा हँडबुक लातूर जिल्हा 2011 व संशोधकाच्या क्षेत्रीय अभ्यासानुसार.

बाजारकेंद्रातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे व्यावसायिक. व्यवसायिकांची बाजारकेंद्रातील उपस्थिती होय. व्यवसायिक त्याच बाजरकेंद्राकडे आकर्षिले जातात जे जवळ आहे. योग्य भाव मिळतो (फायदा) होतो. काही व्यवसायिकांचा वैयक्तिक संपर्क त्या त्या बाजारकेंद्राशी असतो.

तक्ता क्र. 3.10 नुसार लातूर अभ्यास क्षेत्रामधील बाजारकेंद्राचे आपण ग्रामीण व शहरी असे दोन भाग केले आहेत. त्याचे वितरण वरील तालिकेत दाखवण्यात आले आहे. शहरी बाजारकेंद्रामध्ये लातूर, अहमदपूर, औसा या ठिकाणी 100 च्या जवळपास व्यवसायिक येतात. त्याचे शेकडा प्रमाण 15टक्के आहे. निलंगा, रेणापूर, देवणी, उदगीर 100 पैकी अधिक व्यवसायिक येतात. त्याचे शेकडा प्रमाण 30टक्के आहे. तर ग्रामीण बाजारकेंद्र कासारशिर्सी, औराद शहाजनी, मुरुड ही आहेत. येथील व्यवसायिकांची उपस्थिती 20टक्के आहे. तर 100 पेक्षा अधिक व्यवसायिक हाळी, नळेगाव, किनगाव या बाजारकेंद्रात उपस्थित असतात. त्याचे शेकडा प्रमाण 35टक्के आहे.

वरील विवरणावरुन आपणास असे लक्षात येते की, ग्रामीण बाजारकेंद्रामध्ये उत्तम माल व फायदा आहे. त्या ठिकाणी व्यवसायिक अधिक येतात. त्यामागे शहरी भागात व्यवसायिकांचे प्रमाण कमी आहे.

### 3.23 प्राण्यांची आवक व विक्री यानुसार बाजारकेंद्राचे वितरण :

**तक्ता क्र. 3.11**
**प्राण्यांच्या आवक नुसार बाजारकेंद्राचे वितरण**

| अ.क्र. | आवक | बाजारकेंद्राची नावे | संख्या | शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| 1 | 0 - 10000 | अहमदपूर, कासारशिर्सी, औराद शहाजनी | 3 | 23.076 |
| 2 | 10000 - 20000 | निलंगा, औसा, उदगीर, लातूर | 4 | 30.769 |
| 3 | 20000 - 40000 | किनगांव, रेणापूर, मुरुड | 3 | 23.076 |
| 4 | 40000-.....पुढे | हाळी, नळेगाव, देवणी | 3 | 23.076 |
| | | | **13** | **100%** |

स्त्रोत : जिल्हा हँडबुक लातूर जिल्हा 2011 व संशोधकाच्या क्षेत्रीय अभ्यासानुसार.

**प्राण्यांची विक्री नुसार बाजारकेंद्राचे वितरण :**

**तक्ता क्र. 3.12**
**प्राण्यांच्या विक्री नुसार बाजारकेंद्राचे वितरण**

| अ.क्र. | विक्री | बाजारकेंद्राची नावे | संख्या | शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| 1 | 5000 च्या खाली | अहमदपूर, औराद शहाजनी | 2 | 23.0769 |
| 2 | 5000 ते 10000 | कासारशिर्सी, औसा, निलंगा, उदगीर, लातूर | 5 | 30.7692 |
| 3 | 10000 ते 20000 | किनगांव, रेणापूर, मुरुड, नळेगाव | 4 | 30.7692 |
| 4 | 20000---पुढे | हाळी, देवणी | 2 | 15.3846 |
| | | | **13** | **100%** |

स्त्रोत : जिल्हा हँडबुक लातूर जिल्हा 2011 व संशोधकाच्या क्षेत्रीय अभ्यासानुसार.

बाजारकेंद्राचे वितरण हे प्रामुख्याने प्राण्यांची आवक व विक्री यावर अवलंबून असते. ज्या बाजारकेंद्रामध्ये अधिक आवक  तसेच अधिक विक्री असते. वरील तालिकेत प्राण्यांची आवक व विक्री दाखवण्यात आली आहे.

**निष्कर्ष :**

लातूर अभ्यासक्षेत्रामध्ये 13 बाजारकेंद्रे येतात. या 13 प्राण्यांच्या बाजारकेंद्राच्या अभ्यासावरुन असे दिसून येते की, अभ्यासक्षेत्रातील वाढ, विकास व वितरण यामध्ये विभिन्नता दिसून येते. या वेगळेपणाचे कारण म्हणजे लातूर जिल्हयातील भौगोलिक परिस्थिती इतर भौगोलिक घटक तसेच लोकसंख्या घनतेचे असमान वितरण अपुरी वाहतूक सुविधा बाजारचक्रातील असुसंगतपणा इत्यादी.

13 बाजारकेंद्रातील या बाजारापैकी 3 बाजारकेंद्रामध्ये वार्षिक जत्रा (यात्रा) भरतात. बाकीचे बाजार आठवडी आहेत. त्या-त्या गावच्या संस्कृतीनुसार ठराविक काळानंतर लहान-मोठया यात्रा भरतात. शहरी बाजार केंद्राची संख्या जास्त आहे म्हणजे 8 व ग्रामीण 5 एवढी आहे. अभ्यासक्षेत्रातील 3 बाजारकेंद्रामध्ये अतिशय कमी आवक व विक्री होते तर 3 बाजारकेंद्रात आवक अधिक जास्त असते व विक्री देखील अधिक होते.

**संदर्भ सुची :**


1. Brombly R.J. (1975) : “Periodic and Daily Markets in highland Ecuador, University of Cambridge unpublished Ph.D. Thesis submitted to Cambridge University.
2. Census of India (1951-2001) : “District Census Handbook”, Satara District, Series 14, Maharashtra, Part XII, A and B.
3. Clark P.J. and Evans F. C. (1954) : “Distance to Nearest Neighbour as a Measure of Spatial Relationship in Populations”, Ecology, 35, pp. 445-453.
4. Decey M.F. (1965) : “Order Distance in an In Homogonous Random Point Pattern”, Candian Geographer, Vo.9, pp. 141-153.
5. Gharpure V.T. and Pawar C.T. (1984) : “Expected Perspective on Agro Service Centres in Panchaganga Basin (Maharashtra)”, Indian Journal of Regional Science, Vol. XXIII, No.2, pp. 17-24.
6. Gharpure V.T. and Pawar C.T. (1991) : “Expected Perspective on Agro Service Centre in Panchganga Basin (Maharashtra)”, Indian Journal of Regional Science, Vol. XXIII, No.2, pp. 17-24.
7. Hugar S.I. (1984) : “Spatial Analysis of Market System in Dharwad District”, Unpublished Ph.D. Thesis submitted to Karnataka University, Dharwad.
8. Kankure K.B. et al. (2009) : “Distribution of Periodicity of Market Centres in Latur Distrcit Shodh Samiksha Aur Mulykan Vol. II, No. VIII, pp. 45-46.
9. Khan A.I. (2006) : “The Cattle Marketing System Network in Amaravati District”, A Geographical Study, unpublished Ph.D. Thesis submitted to Sant Gadge Baba Amaravti University Amaravati.
10. Pawar C.T. and Lokhande T.N. (2000) : “Spatial Distribution of Market Centres in Kolhapur District, Maharashtra, Geographical Review of India, Vol. 62, No.II, pp. 71-80.

11. Sexena H.M. (1984) : “Geography of Marketing”, (concepts and methodology), Sterling publishers, New Delhi, pp. 88-100.
12. Srivastava U.K. and Srivastava Hari OM (1979) : “ Distributional Pattern and Classification of Market Centres in the Saryypar Plain”, The Deccan Geography, Vol. XVII, pp. 516-523.
13. Ubale P.P. and Lokhande T.N.C. (2011) : “Spatial Distribution of Cattle Market Centres on Solapur Distrcit of Maharashtra”, International Online Multidisciplinary Journal, Review of Research, Vol. I, Issue III, pp. 1-9.
14. Vidhate H.G. (2006) : “The Organization and Management of Weekly cattle Bazaars”, Kailas Publications, Aurangabad.